POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१५ ● मुंबई, शुक्रवार, १५ ऑगस्ट २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# ‘आश्रय ट्रस्टतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात थॅलेसेमिया मुक्त महाराष्ट्र अभियान’ - विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती व मोफत रक्त तपासणी

## थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रम वडनेर भैरव महाविद्यालयात संपन्न आश्रय ट्रस्ट मुंबई चे वतीने विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन; थॅलेसेमियावर सखोल चर्चा










**■वडनेर भैरव । प्रतिनिधी,**
म. विप्र समाजाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वडनेर भैरव येथील प्राणिशास्त्र विभागाच्या वतीने आश्रय ट्रस्ट थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, दिनांक ६ ऑगस्ट २०२५ रोजी उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात थॅलेसेमिया या गंभीर पण प्रतिबंधात्मक आजारासह, नियमित आणि संतुलित आहाराचे महत्त्व, चहाचे तोटे, तसेच विद्यार्थ्यांमध्ये आयर्न कमतरतेची कारणे यावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. महेश वाघ उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी आश्रय ट्रस्ट चे आरोग्य विभागाचे सचिव प्रा. प्रकाश पंगम, नाशिक कमिटी चे रवींद्र कुलकर्णी व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. सुदाम राठोड हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

थॅलेसेमिया या अनुवंशिक रक्तविकाराबाबत डॉ. प्रकाश पंगम यांनी थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधत थॅलेसेमिया एनिमिया कसा प्रसारित होतो, त्याचे प्रकार, लक्षणे, निदानाची प्रक्रिया, गर्भावस्थेतील व जन्मोत्तर तपासण्या, आहारशैली, उपचारपद्धती, तसेच थॅलेसेमिया असलेल्या महिलांना सुरक्षित गर्भधारणेबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. ‘प्रतिबंध हा उपचारांपेक्षा श्रेष्ठ’ हे अधोरेखित करत त्यांनी संतुलित आहाराचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात डॉ. सुदाम राठोड यांनी थॅलेसेमिया पेशंटच्या अनुभवातून विद्यार्थ्यांना जागरूकतेचा संदेश दिला आणि आरोग्य रक्षणासाठी आहारातील योग्य सवयींचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनिता सोनवणे यांनी करत कार्यक्रमाची रूपरेषा व उद्दिष्टे स्पष्ट केली. सूत्रसंचालन प्रा. वैष्णवी कोल्हे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. माधुरी टोपे यांनी केले. समारोपप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुदाम राठोड, आयपीएस समन्वयक प्रा. प्रकाश लांडगे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा. अनिल बचाटे, सायन्स विभाग प्रमुख प्रा. चव्हाण, तसेच महाविद्यालयातील विविध विभागांचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## मराठा विद्या प्रसारक समाजाच्या इगतपुरी येथील गोवर्धने महाविद्यालयात थॅलेसेमिया जनजागृती कार्यक्रम








**■घोटी । प्रतिनिधी,**
कर्मवीर पुंजाबराव गोवर्धने महाविद्यालयात थॅलेसेमिया या रक्तविकाराबाबत जनजागृतीपर कार्यक्रम पार पडला. प्रमुख वक्ते म्हणून आश्रय संस्था आरोग्य विभागाचे कार्यकारी सचिव प्रा. प्रकाश पांगम यांनी थॅलेसेमियाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. प्रा. पांगम यांनी सांगितले की, थॅलेसेमिया माइनर व मेजर यांबाबत जनतेत जागृती होणे आवश्यक आहे. माइनर रुग्णांना लक्षणे नसली तरी त्यांचे विवाह झाल्यास मुलांमध्ये मेजर थॅलेसेमिया होण्याची शक्यता असते. मेजर रुग्णांना दर महिन्याला रक्तदाते हा एकमेव उपचार असून, त्यामुळे प्रत्येकाने तपासणी करून सतर्क राहावे, असे त्यांनी सांगितले.


**कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण रकीबे होते. तसेचआश्रय ट्रस्ट चे संस्थापक डॉ. दीपक नाईक, सौ. प्रीती नाईक, गुरुप्रसाद नाईक, नाशिक जिल्हा महीला प्रमुख स्वाती थेटे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन प्रा. अ. के. चौधरी यांनी केले. यावेळी शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

## अंधेरीत थॅलेसिमिया जनजागृती व रक्त तपासणी शिबिर यशस्वी








**■मुंबई । प्रतिनिधी,**
अंधेरी पश्चिम – आश्रय सामाजिक-सांस्कृतिक-शैक्षणिक ट्रस्ट आणि हेल्थ केअर डायग्नोस्टिक, बांद्रा यांच्या संयुक्त विद्यमाने गांधी शिक्षण भवन, श्रीमती सोजबा कॉलेज ऑफ एज्युकेशन, अंधेरी पश्चिम (जुहू) येथे थॅलेसिमिया जनजागृती व मोफत रक्त तपासणी कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. अलका कोठारी होत्या. तसेच डॉ. दर्शना मिरगल (ङ.ए.ट. हॉस्पिटल) आणि सौ. केतकी सरमळकर, संचालिका झ हेल्थ केअर डायग्नोस्टिक, बांद्रा यांनी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लावली. मुंबई कमिटीच्या वतीने आश्रय ट्रस्टने राबवलेल्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मोठ्या संख्येने नागरिकांनी सहभागी होऊन रक्त तपासणी करून घेतली व थॅलेसिमिया प्रतिबंधाबाबत महत्त्वाची माहिती मिळवली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी आयोजकांनी सर्व सहकार्यकर्त्यांचे मनपूर्वक आभार मानले




## आश्रय ट्रस्टच्या थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र अभियानाला मुंबई आणि नाशिकमध्ये उत्तम प्रतिसाद





















मुंबई/नाशिक
₹थॅलेसिमिया मुक्त महाराष्ट्र₹ या आश्रय ट्रस्टच्या अभियानांतर्गत एकाच दिवशी दोन ठिकाणी प्रभावी जनजागृती कार्यक्रमांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. मुंबई आणि नाशिक येथील समित्यांनी सामाजिक बांधिलकी जोपासत या उपक्रमाला उत्कृष्ट प्रतिसाद दिला. मुंबई येथील द लॉर्ड युनिव्हर्सल कॉलेज ऑफ एज्युकेशन, मालाड येथे थॅलेसिमिया जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन आश्रय ट्रस्ट मुंबई कमिटीच्या अलका कोठारी आणि केतकी सरमाळकर यांच्या पुढाकाराने करण्यात आले. उपस्थित विद्यार्थ्यांना थॅलेसिमिया म्हणजे काय, त्याचे प्रतिबंधक उपाय व रक्तदानाचे महत्त्व याविषयी माहिती देण्यात आली. त्याच दिवशी, नाशिकमध्ये मराठा विद्या प्रसारक समाज संचलित कॉमर्स, मॅनेजमेंट अँड कॉम्प्युटर सायन्स कॉलेज, गंगापूर रोड येथे देखील जागतिक अवयव दिनानिमित्त थॅलेसिमिया जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात आश्रय ट्रस्टचे पितामह प्रा. प्रकाश पांगम यांनी मार्गदर्शन केले. या दोन्ही कार्यक्रमांचे आयोजन अनुक्रमे मुंबई आणि नाशिक कमिट्यांनी अतिशय उत्तम प्रकारे पार पाडल्याने, आश्रय ट्रस्टतर्फे सर्व संयोजकांचे हार्दिक स्वागत आणि अभिनंदन करण्यात आले आहे.



## संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक


## मानवी आरोग्य रक्षणात धार्मिक अट्टाहास नको

कबूतर खरेतर प्रेमाचा संदेश देणारा आणि शांतीप्रिय पक्षी म्हणून ओळखला जातो. मात्र, याच पक्ष्यामुळे सध्या शांततेचा भंग झाल्याचे पाहायला मिळत आहे. यासाठी ठिणगी पडली ती दादरमधील कबूतरखान्याची. वास्तविक कबूतर या पक्ष्याचा द्वेष करावा, यासाठी काही कारण नाही. इतर पक्ष्यांप्रमाणे तोही उडतो, भटकंती करतो, मिळेल ते खातो, कुणाचे प्रेमाचे संदेश पोहोचवतो. पूर्वीपासून शांतीचा संदेश देण्यासाठी कबूतरे उडवण्याची प्रथा आहे. त्यामुळे वाद निर्माण होण्याचे काहीही कारण नाही. मात्र, काही वर्षांपासून कबूतरांचा वावर असलेल्या ठिकाणी माणसे आजाराने ग्रस्त होत असल्याचे निदर्शनास आले आहे. कबूतरांमुळे माणूस व्याधीग्रस्त होत असल्यामुळे त्यांना मानवी वस्तीपासून दूर ठेवण्याची मागणी मुंबईत अनेक वर्षांपासून होत आहे. विशेष म्हणजे मुंबईत भरवस्तीत कबूतरखाने आहेत. दादर कबूतरखाना त्यापैकीच एक. कबूतरखाना ही दादरची स्वतंत्र ओळख आहे. याच कबूतरावरून ह्यपरिंदाह्ण नावाच्या चित्रपटाची निर्मिती झाली होती आणि त्याचे शूटिंग दादर कबूतरखान्याजवळ झाले होते. याची अनेकांना माहितीही असेल. जैन धर्मियात कबूतरांना विशेष महत्त्व आहे. पक्ष्यांना त्यातही खासकरून कबूतरांना दाणापाणी घातल्याने आपल्या पूर्वजांच्या आत्म्याला शांती मिळते आणि त्यामुळे पितृदोषापासून मुक्ती मिळते, असे जैन धर्मिय मानतात. त्यामुळे त्यांना कबूतरांविषयी आस्था असणे साहजिकच आहे. दखल घेण्यासारखी बाब म्हणजे भारतात मुघल सत्ताधीशांना कबूतरे आवडायची. अकबर किंवा इतर मुघल राजांनी हजारोंच्या संख्येने कबूतरे पाळली होती, असे इतिहासात नमूद आहे. आपल्याकडे ह्यमैने प्यार कियाह्ण या चित्रपटात तर प्रेमाचे संदेश घेऊन जार्णाया कबूतरावर खास गाणे आहे. त्यामुळे कबूतरांचा द्वेष करण्याचा विचार कुणाच्याही मनात नाही. असे असताना कबूतरखाने बंद करण्यावरून जैन धर्मिय आक्रमक का झाले आणि इतर समाजाला का वेठीस धरले जाते, याचा शांतपणे आणि माणुसकीच्या दृष्टिकोनातून विचार करणे खूप गरजेचे आहे. कबूतरखाने बंद करण्याचा आणि धमार्चा काही संबंध आहे, ही शंकादेखील मनातून काढून टाकली पाहिजे. यासाठीच सामंजस्याने भूमिका घेणे खूप गरजेचे आहे. मूळात कबूतर कितीही चांगला पक्षी असला तरी तो मानवी आरोग्याला हानिकारक आहे, हे मान्य केले पाहिजे. कबूतरांमुळे माणसाला फुप्फुसाचे आजार, न्यूमोनिया, श्वसनाचे आजार होतात. हे खूप गंभीर आहे. कबूतरांमुळे हायपर सेन्सिटीव्हीटी न्यूमोनायटिस हा फुप्फुसाचा आजार होतो. कबूतरांचा कायम वावर, त्यांची विष्ठा, पिसे किंवा धुळीचे कण सतत श्वासातून शरीरात गेल्याने हा आजार होतो. त्यामुळे श्वास घ्यायला त्रास होणे, सतत कोरडा खोकला येणे असे आजार होतात. माणसाला श्वासोच्छ्वासास त्रास होणे, दम्यासारखा आजार होणे यांचा विचार केला तर मानवी वस्तीत कबूतरांना संरक्षण देणे किती अयोग्य आहे, हे लक्षात येते. म्हणूनच मुंबई आणि परिसरात अनेक वर्षांपासून कबूतरखाने बंद करण्याची मागणी जोर धरत आहे. यातूनच कबूतरखान्यांमध्ये कबूतरांना धान्य खायला घालू नका, असा आदेश मुंबई महापालिकेला द्यावा लागला. त्यामुळे जुलैपासून मुंबईत कबूतरखाना हा संवेदनशील विषय बनला आहे. सध्या हे प्रकरण मुंबई उच्च न्यायालयात आहे. माणसांना कबूतरांचा त्रास होत असल्याने कबूतरखाने बंद ठेवण्यावर न्यायालय सहमत आहे. तसेच कबूतरांना खायला घालू नये जेणेकरून त्यांचा कबूतरखान्यांमधील वावर आणि संचार हळूहळू कमी होईल, असा साधा विचार यामागे आहे. मात्र, इथे धर्म आणून शांतताप्रिय अशी ओळख असलेल्या जैन धर्मियांनी चुकीचा पायंडा पाडण्याचा प्रयत्न केला आहे. कबूतरे जैन धर्मियांना प्रिय आहेत म्हणून त्यांना कुणाचा विरोध नाही, हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे. एवढेच नव्हे तर त्यासाठी कबूतर आणि कावळा यांची तुलनाही करता कामा नये. एवढी वर्षे त्रास झाला नाही तर आताच का होतो, असला नाहक युक्तीवादही करता कामा नये. कारण एवढी वर्षे आरोग्याचा त्रास सहन केला तो नकळत असू शकतो, त्याची जाणीव नसणे असाही असू शकतो किंवा उगाच विरोध कशाला या भूमिकेतून असू शकतो, हे लक्षात घ्यायला हवे. मुळात जो पक्षी माणसाला त्रासदायक, आजारांना आमंत्रण देणारा आहे, त्यासाठी अट्टाहास न करता माणसाची बाजू घेणे अपेक्षित आहे. कबूतरांचा त्रास माणसांना होताना तो धर्म पाहून होत नाही. शिवाय कबूतरांना कुणी धान्य दिले नाही म्हणून त्याला फरक पडणार नाही. निसगार्ने सर्व पशू-पक्ष्यांच्या पोटापाण्याची किटक, गवत, मांस आदी सोय केली आहे. इतर पक्षी जसे त्यांचा दाणापाणी मिळवतात तसे कबूतरेही मिळवतील. मात्र, कबूतरखान्यांच्या अट्टाहासापोटी माणसाचा जीव धोक्यात येईल, असे जैन धर्मियांनी वागू नये. कबूतरांच्या हट्टाने गाडीच्या टपावरून धान्य खायला देऊ नका, इतर इमारतींवर धान्य टाकून कबूतरांची सोय करू नका आणि कायदा मोडू नका. कारण मुद्दा धमार्चा नाही तर माणसांच्या आरोग्याचा आहे.

# आरोग्य यंत्रणा सक्षम होणार का?

नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथे काही दिवसांपूर्वी बोगस डॉक्टरवर झालेली कारवाई ही धाक दाखविण्यासाठी होती का? इतर बोगस डॉक्टरांचे काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे नाशिक जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सरकारी वैद्यकीय क्षेत्र पुरते कोलमडले असल्याचे चित्र मागील काही घटनांवरून दिसून येत आहे. काही प्राथमिक आरोग्य केंद्रांत औषध साठा आहे, तर डॉक्टर नाहीत, काही ठिकाणी डॉक्टर आहेत, तर औषध साठा नाही आणि दोन्ही असतील, तर संबंधित आरोग्य कर्मचारी परिचारिका, वॉर्डबॉयच बेपत्ता असतात. रात्रपाळीतील डॉक्टर अन्‌ कर्मचारी तर, कधीतरी कामाच्या ठिकाणी दिसतात. त्यामुळे अडलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाइकांना नाइलाजास्तव खासगी डॉक्टरांकडे जाऊन महागडा औषधोपचार, तसेच शस्त्रक्रिया कराव्या लागत आहेत. दरम्यान जिल्हा आरोग्य अधिकारीदेखील विशाखा समितीच्या चौकशीत अडकले होते. तत्कालीन सीईओ अशीमा मित्तल यांनी जाताना त्यांना क्लीनचिट दिली असली तरी, काही संघटनांकडून त्यांच्या चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. नाशिक जिल्ह्यात पेठ, सुरगाणा, त्र्यंबकेश्वर हरसूल, इगतपुरी ही तालुके आदिवासीबहुल आहेत. या तालुक्यांमधील अनेक गावांत रस्ते, वीज पोहोचलेली नाही. त्यामुळे त्याचा आरोग्य यंत्रणेवर देखील मोठा परिणाम झालेला दिसून येत आहे. अनेक महिलांना प्रसूतीसाठी रुग्णालयात येण्यासाठी रस्ते नसतात. रुग्णालयात आल्यानंतर त्या ठिकाणी डॉक्टर आणि अत्यावश्यक अशी मशीनरी देखील नसते. अनेक महिलांची प्रसूती ही रस्त्यात किंवा घरी देखील झाली आहे. त्यामुळे जिल्हा आरोग्य यंत्रणा कोलमडली असल्याचे चित्र आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी देखील ग्रामीण भागात दौरे करत आहे, परंतु त्याचा अद्याप काही उपयोग झाला नसल्याचे समोर आले आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा येथे काही दिवसांपूर्वी बोगस डॉक्टरवर झालेली कारवाई ही धाक दाखविण्यासाठी होती का? इतर बोगस डॉक्टरांचे काय, असा सवाल उपस्थित केला जात आहे. जिल्ह्यात यापूर्वी ग्रामीण भागात अनेक बोगस डॉक्टर सापडले आहेत; परंतु या डॉक्टरांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने रुग्णांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. जिल्ह्यातील ग्रामीण भागांत जिल्हा परिषदेमार्फत आरोग्य सेवा दिली जाते. काही दिवसांपूर्वीच श्री कपालेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्याने दुर्गम भागातून केंद्रात प्रसूतीसाठी आलेल्या आदिवासी महिलेला रुग्णालयात दाखल न करता हुसकावून दिले होते. या प्रकरणी जिल्हा परिषदेने चौकशी करत या डॉक्टरांच्या विरोधातील अहवाल राज्य शासनाकडे पाठवला आहे. दरम्यान, संबंधित डॉक्टरची विभागीय स्तरावरून चौकशीदेखील झाली; परंतु पुढे काहीच झाले नाही. जिल्ह्यात काही महिन्यांत अंजनेरी (त्र्यंबकेश्वर), चिंचओहोळ (मालेगाव), चांदोरी (निफाड) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांबाबत तक्रारी प्राप्त झाल्या होत्या; परंतु त्याबाबत कारवाई गुलदस्त्यातच आहे. कपालेश्वर प्राथमिक आरोग्य केंद्रात रात्री अकराच्या सुमारास कल्पना भोये (रा. खडकी, ता. कळवण) प्रसूतीसाठी गेल्या होत्या. मात्र, तिला रुग्णालयात दाखल करून न घेता डांगसौंदाणे ग्रामीण रुग्णालयात जाण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. महिलेचे वडील काकाजी बागूल व नातेवाइकांना मद्यधुंद अवस्थेत असलेल्या या डॉक्टरने त्यांच्यासोबत असलेल्या बीडच्या मित्राने त्या महिलेला व नातेवाइकांना अक्षरशः हुसकावून लावले. त्यानंतर या कुटुंबाने तत्काळ डांगसौंदाणे ग्रामीण रुग्णालयात नेले. तेथे त्या महिलेची प्रसूती झाली. दुसऱ्या दिवशीही डॉक्टर मद्यधुंद स्थितीत असल्याचे संबंधित महिलेच्या नातेवाइकांनी सांगितले; परंतु पुढे काहीच होत नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. जिल्ह्यातील त्र्यंबकेश्वर, चिंचओहोळ (मालेगाव), चांदोरी (निफाड)सह इतर काही ठिकाणच्या प्राथमिक आरोग्य केंद्राची परिस्थितीही फारशी वेगळी नाही. अनेक वाईट अनुभव ग्रामस्थांना सातत्याने येत आहेत; परंतु प्रशासन याबाबत कोणतीही ठोस कारवाई करताना दिसून येत नाही. त्यामुळे पयार्याने सर्वसामान्य नागरिकांना बोगस डॉक्टरांच्या दवाखान्याची वाट धरावी लागत आहे. हे बोगस डॉक्टर जिल्ह्यातील अनेक भागांत कार्यरत असल्याचा संशय व्यक्त केला जात आहेत; परंतु दिखाऊ कारवाई काही उपयोगाची नाही. ठोस अशा उपाययोजना करण्याची खरी गरज निर्माण झाली आहे. अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या हजेरीसाठी तत्कालीन सीईओ आशिमा मित्तल यानी ॲपदेखील कार्यान्वित करण्याचे आश्वासन दिले होते; परंतु हे आश्वासनदेखील हवेत विरले आहे. आजही अनेक अधिकारी, कर्मचारी कामावर न जाता मुख्यालयी येत असल्याचे चित्र आहे. जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांचे जिल्हाभर दौरे खूप सुरू असतात; परंतु त्या दौऱ्यांचे फलित अद्याप दिसून येत नाही. आरोग्य अधिकाऱ्यांना विशाखा समितीकडून त्यांना तात्पुरता दिलासा मिळाला असला तरी चौकशीच्या फेऱ्यात सापडण्याची शक्यता नाकारता येत नाही. या सर्व गोष्टींवर मात करून आगामी काळात आरोग्य यंत्रणा अधिक सक्षम होईल, अशी अपेक्षा व्यक्त करूया.

# अखंड भारत संकल्प दिन-विभाजन विभीषिका दिवस



भारताच्या स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता होऊन स्वातंत्र्याचा अमृतकाळ सुरू झाला. आपल्या सर्वांसाठी हा गौरवशाली प्रवास आहे. 'हर घर तिरंगा' अभियानात मागील तीन वर्षे आपण सर्वांनीच अभिमानाने आणि आनंदाने सहभाग घेतला आहे, याची खात्री आहेच! तसाच यावर्षीसुद्धा घ्याल अशी अपेक्षा! अर्थात, यातही खोडा घालण्याचे काम विघ्नसंतोषी आणि 'भारत तोडो' मानसिकतेची मंडळी करत आहेतच. यानिमित्ताने आजच्या अखंड भारत संकल्प दिन-विभाजन विभीषिका दिनाचे औचित्य साधून असाच एक वेगळा विषय मांडण्याचा केलेला हा प्रयत्न...

रताला दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. पण, हे स्वातंत्र्य खंडित करणारे ठरले.पाकिस्तानच्या निर्मितीसाठी भारतभर मुस्लिमांनी केलेले दंगे, लाखो अबालवृद्ध हिंदूंच्या कत्तली, हजारो महिलांच्या अब्रूंचे धिंडवडे, पाकिस्तानातील निर्वासित हिंदूंच्या कत्तली सारेच रक्तरंजित होते. लाहोरवरून भारतात आलेली रेल्वे पूर्णपणे हिंदूंच्या प्रेताने भरलेली होती. जे त्यातूनही जे वाचले, त्यांची अवस्थेचे वर्णनही भयावह होते. त्यावेळी भारतात आलेल्या महिलांच्या शरीरावर अत्याचाराच्या खुणाही होत्या आणि यावर कडी म्हणून की काय, दिल्लीतल्या महात्म्याने या मंडळींना आधार देण्यासही नकार दिला. एवढेच काय, त्यांना साधी सहानुभूतीसुद्धा दाखवली नाही. धर्मनिरपेक्षतावादाचा जीवघेणा कळस या मंडळींनी अनुभवला. रक्ताचे अश्रू सहन केलेल्या आमच्याच हिंदू बांधवांना दिल्लीत झिडकारले जात होते आणि आमचे नेते खंडित स्वातंत्र्याचा आनंदोत्सव करत होते; महात्म्याचे गुणगान गात होते. 'दे दी हमे आजादी बिना खड्ग बिना ढाल,' रक्ताचा थेंबही न सांडता मिळालेले स्वातंत्र्य, अशी भलामण करत होते! हे आपल्या स्वातंत्र्याचे वास्तव आहे. पंतप्रधान मोदी यांनी दोन वर्षांपूर्वी जाहीर केले की, दि. १४ ऑगस्ट रोजीचा हा दिवस फाळणीच्या या जखमांची आठवण जागवणारा 'विभाजन विभीषिका दिवस' म्हणून पाळला जावा. त्यातही याला लिबरल, डावे, फुटीरवादी मानसिकतेचे पत्रकारांनी विरोध करायला सुरुवात केली. फाळणीच्या वास्तवावर एक मालिका दाखवल्याबद्दल दूरदर्शनचे आभार मानायलाच हवेत. ज्यांना त्या दिवसाचे वास्तव जाणून घ्यायची इच्छा असेल, त्यांनी प्रशांत पोळ यांनी लिहिलेले 'वे पंद्रह दिन' हे पुस्तक वाचावे. यामध्ये त्या दिवसांचे यथार्थ वर्णन आले आहे. देशाची फाळणी माझ्या शरीराच्या तुकड्यावरून होईल, असे सांगणारा महात्मा फाळणीला दुजोरा देता झाला. नेहरूंसारख्या नेत्यांना खंडित स्वातंत्र्याचीच घाई लागली होती आणि त्यासाठी लाखो हिंदूंना वाऱ्यावर सोडून देण्याची तयारी होती. ज्यांनी हिंदुस्तान अखंड राहावा यासाठी प्रयत्न केले, त्यांना जातीयवादी ठरवून आधीही अवहेलना केली आणि आजतागयत जातीयवादी हाच शिक्का मारत आहेत. काही नेते आणि संघटना यांना संपविण्याचाही प्रयत्न झाला. तशी फाळणीच्या वास्तवावर बोट ठेवणारी अनेक पुस्तके आज उपलब्ध आहेत परंतु, प्रश्न आहे तो आपण जाणून घेण्याचा प्रयत्न करण्याचा. इंग्रजांनी भारत एकसंध केला वगैरे संकल्पना, आपल्या माथ्यावर मारल्या गेल्या आहेत. मागील ७५ वर्षांत तेच माथी मारल्यामुळे तीन-चार पिढ्या हेच घोकत आल्यामुळे, तेच सत्य वाटू लागले आहे.

वास्तविक भारत हा हजारो वर्षांची समृद्ध परंपरा असलेला, सांस्कृतिक, वैज्ञानिक, स्थापत्य शास्त्र, अध्यात्म अशा सर्वांच क्षेत्रात अग्रेसर असलेला देश. जगभरातील मानवजातीला ज्ञान आणि विज्ञानाने, सांस्कृतिक वारशाने समृद्ध करणारा देश म्हणजे भारत होय. अखंड भारताचे मानचित्र पाहिले, तर त्याच्या प्रचंड विस्ताराची कल्पना येते. इथे अनेक महापुरुष, वैज्ञानिक, योद्धे आणि शासक होऊन गेले. त्यांनी जगाला ज्ञान आणि संस्कृतीद्वारे बांधण्याचा प्रयत्न केला. दुदैर्वाने स्वातंत्र्यानंतर डाव्या लिबरल मंडळींनी हा गौरवपूर्ण वारसा दडपून टाकला. मेकॉलेचीच री ओढत, भारत हे कधी एक राष्ट्र नव्हतेच हेच सांगितले. भारताचा इतिहास मुघलांपासूनच सुरू होतो हेच बिंबवले. जाणूनबुजून हिंदूंना न्यूनगंडाच्या भावनेत ढकलले गेले. परंतु, आता या गौरवशाली इतिहासाचा अभ्यास सुरू झाला आहे. मोठ्या प्रमाणात पाश्चात्य मंडळीही पुराव्यासह सत्य मांडू लागली आहेत. हा विषय बराच गहन आणि मोठा आहे. मात्र, यातून एक बाब सिद्ध होते की, भारत हे फार पूर्वीपासूनच एक सांस्कृतिकरित्या समृद्ध राष्ट्र होते. अगदी मुघल काळातसुद्धा या राष्ट्राला मुघल आक्रमणापासून वाचवण्यासाठी, आसेतु हिमाचलमधील अनेक वीरांनी प्राणांची आहुती दिली. त्यामुळेच मुघल कधीही संपूर्ण भारतवर्षावर राज्य करू शकले नाही. इंग्रजांनी सांस्कृतिक दृष्टीने अखंड असलेल्या भारताचे तुकडे केले. म्यानमार, श्रीलंका, नेपाळ, तिबेट, अफगाणिस्तान भाग आधीच वेगळे केले आणि जो काही भाग शिल्लक होता, त्याचे धार्मिक आधारावर विभाजन घडवले. त्यानंतर राहिलेला भूभागही खंडित करून, भारताला खंडित स्वातंत्र्य दिले. अजूनसुद्धा याच पठडीतल्या मंडळींकडून भारत तोडण्याची कारस्थाने, इथल्याच मंडळींच्या आधाराने सुरू आहेत. देशाला मिळालेले स्वातंत्र्य, प्रचंड संघर्षानंतर मिळालेले आहे. दुदैर्वाने त्यालाही विकृत स्वरूप दिले गेले. हजारो स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करणार्या अनेक अनाम वीरांना, विस्मृतीत घालविण्याचे काम मात्र इमाने इतबारे केले गेले. एक परिवार आणि महात्मा सोडून अन्य सर्वांचेच योगदान नाकारले गेले. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे स्वातंत्र्य चळवळीत त्यांचे योगदान काय ? हा प्रश्न ते आजही उपस्थित करतात. याहूनही गलिच्छ आरोप सावरकरांवर आजही सुरु आहेत. आणखीन एक वास्तव समजून घ्यायची आवश्यकता आहे की, स्वातंत्र्यसंग्राम हा विजयनगर साम्राज्याच्या अस्तानंतर आणि मुघल साम्राज्य बस्तान बसवू लागले तेव्हापासूनच सुरू झाला, तो १९४७ साली ब्रिटिश इथून जाईपर्यंत सुरूच होता. मात्र, आपल्याला स्वातंत्र्यसंग्राम हा फक्त इंग्रजांविरुद्ध होता असेच सांगितले जाते. तेव्हापासून असंख्य नररत्नांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, हजारो महिलांनी जोहार केला, हजारो साधू-संतांचेही यात योगदान आहे. हे सारे एकाच प्रांतातले नाही बरं का! असेतू हिमाचल पसरलेल्या भारतवषार्तील सर्वांचा सर्व समाजातील, सर्व वगार्तील स्त्री पुरुषांचा यात सहभाग आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रेरणेने त्यावेळच्या लष्करामध्ये पुरुषांबरोबर महिलाही सहभागी झाल्या होत्या पण, हा इतिहास शिकवला जात नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, आमच्या तथाकथित नेते मंडळींची राष्ट्र आणि राष्ट्रवादासंबंधी भ्रामक संकल्पना, आणि त्याचबरोबर संस्कारांनी इंग्रज असलेल्या मंडळींचा राजकारण आणि समाजकारणावर असलेला भक्कम विळखा आणि त्याचबरोबरीने आत्माविस्मृत हिंदू भारतीय समाज!

आपल्याला स्वातंत्र्य सहज मिळालेले नाही. असे कितीतरी अगणित ज्ञात-अज्ञात ज्यांनी देशासाठी आपल्या घरादाराची राखरांगोळी केली आहे. या सर्वांचे योगदानही माहीत नाही आणि शिकवलेही नाही. 'नाही चिरा नाही पणती' अशीच स्थिती आहे. या सर्वांच्या, बलिदानावरच आपले स्वातंत्र्य उभे आहे, हे आपण विसरता कामा नये. तेव्हाच्या काँग्रेस नेत्यां एवढेच किंबहुना काकणभर जास्तच प्रयत्न या क्रांतिकारकांचे आहेत.स्वतंत्र भारतात जन्मालेल्या आजच्या पिढीला हा छद्म इतिहास शिकवला गेला आहे; त्यांना या सर्व पराक्रमाची, त्यागाची माहिती करून देणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्याचा आनंद आहेच परंतु, ते खंडित असल्याचे शल्यही आहे. भारतमातेला पुन्हा अखंड स्वरूप प्राप्त करून देणे, हे आपले सर्वांचेच स्वप्न असले पाहिजे. आजचे आपले राज्यकर्ते कणखर निर्णय घेणारे आहेत. काश्मीरचे 'कलम ३७०' रद्द झाले, '३५ ए' रद्द झाले. राष्ट्रीय विचारांचा पाठपुरावा करणार्या मुस्लिमांच्या संघटना उभ्या राहात आहेत. मला आठवते की, आम्ही महाविद्यालयात असताना 'कलम ३७०' रद्द करा, 'जिस काश्मीर को खून से सिंचा वह काश्मीर हमारा हैं, काश्मीर से कन्याकुमारी तक भारत देश हमारा हैं' अशा घोषणा देत सायकल रॅली काढल्या आहेत आणि 'काय ही मुलं मूर्खपणाच्या घोषणा देत आहेत,' असे रस्त्यावरील मंडळी, खिडकीतून आणि गॅलरीतून डोकावणारी मंडळी म्हणायची.

हे खरंच होईल का? काय वेडेपणाचे आहे हे? आणि आज तेच खरं झालेले आपण पाहतो आहोत. आतातर पाकव्याप्त प्रदेश आमचाच भाग आहे, हे सुद्धा ठणकावून सांगितले जात आहे. पाकिस्तानही दुहीच्या आणि फुटीच्या मार्गावर आहे. बलुच क्रांतिकारी मंडळींनी तर जणू तर स्वातंत्र्य युद्धालाच सुरुवात केली आहे. गंमत म्हणजे, ज्यांनी पाकव्याप्त काश्मीर निर्माण होऊ दिला, तीच मंडळी ह्यपाकव्याप्त काश्मीर परत कधी घेणार, असे विचारत आहेत. खरं खोटं माहिती नाही; पण श्रीलंका, नेपाळ इथली मंडळीही भारताशी जोडण्याचा प्रयत्न करत आहेत म्हणे. या आपसूक घडून येणार्या बाबी नक्कीच नसाव्यात. असो! इस्त्रायलने २००० वर्षे पाठपुरावा करत, अखेर आपला प्रदेश मिळवत एक बलशाली राष्ट्र निर्माण केले. आजही इस्त्रायल आजूबाजूच्या इस्लामी कट्टरवादी राष्ट्रांशी समर्थपणे लढत आहे. विभाजित जर्मनीही एक झाला, ही उदाहरणेही समोर आहेतच. मंडळी, सहज, सोपे असे काहीच नसते आणि ते सोपे नसते म्हणूनच, ते आव्हानात्मक आणि करणीय असते. फाळणी टाळण्यासाठी प्रयत्न करणार्या असंख्य मंडळींचे पाय खेचण्याचे काम तथाकथित नेते मंडळींनी केले नसते, तर कदाचित ही फाळणीसुद्धा टळली असती.

मंडळी,'अखंड भारत' हे आपल्या पूर्वजांनी आपल्याला सोपविलेले संचित होते. आपला भौगोलिक आणि सांस्कृतिक ठेवा होता आणि तो पुन्हा वास्तवात आणणे हे काल कदाचित स्वप्नरंजन वाटत असेल पण, आता घडणार्या सामाजिक आणि राजकीय घटनांनी पुन्हा एकदा या स्वप्नाला आकार द्यायला सुरुवात केली आहे. आज या संस्कृतीचा पाईक असलेला हिंदू समाज जागृत होत आहे. गरज फक्त दुर्दम्य मानसिकतेची आहे. आपल्या देशाप्रति, संस्कृतीप्रति असलेला अभिमान जागृत ठेवायला हवा. हे सहजसाध्य नाही; पण असाध्यही नक्कीच नाही. हे स्वप्नरंजन नाही, तर आपल्या मातृभूमीचे गतवैभव परत मिळवून द्यायचा दुर्दम्य आशावाद आहे. आपल्या इतिहासात डोकावून पाहिले, तर भारताकडे शक्तिशाली राष्ट्र म्हणून गौरवाने पाहिले जायचे. हिंदू समाज हा शक्तिशाली, सामर्थ्यसंपन्न, वैभवशाली होता. तो आज आत्मविस्मृत झाला आहे. मागील १०० वर्षांत अनेक धुरिणांनी केलेल्या प्रयत्नांमुळे आता थोडीफार जागृती दिसत आहे हे सुचिन्ह! अजूनही बराच पल्ला गाठायचा बाकी आहे. हिंदू समाज जागृतीचे, संघटनांचे प्रयत्न यांची व्याप्ती आणि वेग वाढवावा लागेल, हिंदू तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यथार्थ स्वरूपात समाजात रुजवयाचा प्रयत्न अधिक गतीने करावा लागेल. हे घडेल तेव्हा हिंदू समाज बाजूच्या सर्व आव्हानांना पुरून उरेल यात शंका नाही. अर्थात यासाठी किती वेळ लागेल याचे गणित आज मांडता येणार नाही पण, तोपर्यंत हे स्वप्न जागृत ठेवायला हवे ना. आमच्या पूर्वजांचे हे स्वप्न पूर्ण करण्याचा संकल्प प्रत्येक पुढील पिढ्यांकडे स्वप्नपूर्ती होईपर्यंत वारसा म्हणून गेला पाहिजे. दुर्दम्य आशावाद आणि आश्वासक प्रयत्न याला पर्याय नाही. याला आणखीन बाजू म्हणजे ह्यअखंड भारतह्ण फक्त पाकिस्तान, बांगलादेश नव्हे. 'अखंड भारता'चा नकाशा पाहिला, तर त्याचा पसारा बराच मोठा आहे. महाभारतकालीन संदर्भ लक्षात घेतले, तर अफगाणिस्तान, जावा, सुमात्रा, मलेशिया, इंडोनेशिया, मालदीव आणि आसपासची बेटे, श्रीलंका, इराण आणि आशिया खंडाचा बराचसा भाग. नेपाळ तर आता आतापर्यंत एकमेव हिंदू राष्ट्र होते. आताही पुन्हा हिंदू राष्ट्र व्हावे म्हणून, तेथील जनता आंदोलन करत आहे. आजचे भूराजकीय स्वरूप पाहता राजकीयदृष्ट्या 'अखंड भारत' ही कल्पनाच शक्य नाही परंतु, सांस्कृतिक धाग्याने जोडलेला प्रदेश ज्याचे सांस्कृतिक नेतृत्व भारत करू शकेल या दृष्टीने पाहावे लागेल.

हिंदू संस्कृतीने कधीही तलवारीच्या जोरावर प्रदेश बळकावण्याचा प्रयत्न केला नाही आणि या पुढेही असे होण्याची सुतराम शयता नाही. त्यामुळे सांस्कृतिक धाग्याच्या आधारावर एकत्र येत, एकमेकांच्या साहाय्याने एकमेकांना आधार देत, आर्थिक आणि सामाजिक उन्नत्ती असा व्यापक विचार होऊ शकतो. पण जोवर राष्ट्रप्रेमी हिंदू संघटित होत नाही, त्याच्यात विजिगिशू वृत्ती निर्माण होत नाही, तोपर्यंत याचे सत्यात येणे दूरच. पण, आम्ही संकल्पच केला नाही, तर त्यादृष्टीने प्रयत्न कसे होणार? हे स्वप्न प्रत्यक्षात यायला किती वेळ लागेल याचा अंदाज नाही पण, त्यादृष्टीने प्रयत्न सुरू ठेवले तर जेव्हा केव्हा हे साध्य होईल, तेव्हाची पिढी आपल्या आधीच्या पिढ्यांप्रति नक्की कृतज्ञ भाव ठेवेल. उद्या दि. १५ ऑगस्ट रोजी आपला स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करूयातच. पण, ते करताना या भारतमातेला तिचे अखंडत्व पुन्हा मिळवून द्यायचे आहे, हा संकल्प मनात जागवू या. भारत पुन्हा अखंड करण्यासाठी कटिबद्ध होऊयात.

**भारत माता की जय!**



# भारताच्या स्वातंत्र्यासाठी १५ ऑगस्ट ही तारीखच का निवडली गेली होती?





१५ ऑगस्ट हा दिवस भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. याच दिवशी भारत स्वतंत्र झाला. दरवर्षी हा दिवस मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. लाल किल्ल्यावर तिरंगा फडकवला जातो आणि देशभक्तीपर वातावरणाने देश भारून जातो. पण, भारताला स्वातंत्र्य देण्यासाठी १५ ऑगस्ट हाच दिवस का निवडला गेला, यामागील कारण काय आहे, हे आपण या लेखात पाहणार आहोत.

भारताच्या स्वातंत्र्यासाठी १५ ऑगस्ट ही 1947: भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ मध्ये इंग्रजांपासून स्वातंत्र्य मिळाले. या दिवशी देशभरात जल्लोष करण्यात आला होता. पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांनी देशवासियांना उद्देशून भाषण केले होते. स्वातंत्र्यासाठी १५ ऑगस्ट तारीखच का निवडली ते आज आपण पाहणार आहोत.

**चला तर जाणून घेऊया सविस्तर...**

**व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन -**



ब्रिटिश सरकारने भारताला 30 जून 1948 पर्यंत स्वतंत्र करण्याची योजना आखली होती. मात्र, त्यावेळी देशातील परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण होती. देशाच्या विभाजनावरून राजकीय संघर्ष वाढत होता आणि जातीय हिंसाचाराचा धोका निर्माण झाला होता. अशा स्थितीत, ब्रिटनचे शेवटचे व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनी ठरवले की, परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी भारताला निर्धारित वेळेआधी स्वातंत्र्य द्यावे.

**दुहेरी ऐतिहासिक आठवण**



या निर्णयानुसार, ४ जुलै १९४७ रोजी ब्रिटिश संसदेत इंडियन इंडिपेंडेंस बिल सादर करण्यात आले आणि त्याला मंजुरी मिळताच १५ ऑगस्ट हा भारताच्या स्वातंत्र्याचा दिवस म्हणून घोषित करण्यात आला. लॉर्ड माउंटबॅटन यांच्यासाठी १५ ऑगस्ट हा दिवस खूप महत्त्वाचा होता. १५ ऑगस्ट १९४५ रोजी दुसरे महायुद्ध संपले, जेव्हा जपानने औपचारिकपणे मित्र राष्ट्रांसमोर आत्मसमर्पण केले. त्यावेळी माउंटबॅटन मित्र राष्ट्रांच्या सैन्यात एका महत्त्वाच्या पदावर होते आणि या विजयाचे श्रेय त्यांनाही मिळाले होते. त्यामुळेच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी हाच दिवस निवडला, जेणेकरून हा दिवस त्यांच्यासाठी दुहेरी ऐतिहासिक आठवण ठरेल.

**स्वातंत्र्याच्या भव्य कार्यक्रमात महात्मा गांधी का नव्हते?**



१५ ऑगस्ट १९४७ रोजी दिल्लीत स्वातंत्र्याचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधी तिथे उपस्थित नव्हते. तेव्हा ते बंगालमध्ये दंगे शांत करण्यात व्यस्त होते. गांधीजींचे मत होते की, 'खरे स्वातंत्र्य तेव्हाच असेल, जेव्हा हिंदू-मुस्लिमांमध्ये बंधुभाव निर्माण होईल. त्यांना विभाजनासोबत मिळालेल्या स्वातंत्र्यात आनंद नाही, कारण त्यात भविष्यातील संघर्षाची शक्यता लपलेली आहे, असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.

**संघर्ष आणि बलिदानाची आठवण करून देणारा दिवस**



आज अनेक दशकांनंतरही, १५ ऑगस्ट हा केवळ स्वातंत्र्य दिवस नाही, तर आपली एकता, संघर्ष आणि बलिदानाची आठवण करून देणारा दिवस आहे. हा दिवस आपल्याला शिकवतो की, कठीण परिस्थितीतही योग्य निर्णय आणि एकजुटीने बदल शक्य आहे. १५ ऑगस्ट हा दिवस भारताच्या इतिहासातील एक महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि एका नव्या युगाची सुरुवात झाली. हा दिवस आपल्याला त्या वीरांच्या त्यागाची आठवण करून देतो, ज्यांनी देशासाठी आपले प्राण अर्पण केले. त्यामुळे, हा दिवस केवळ एक उत्सव नसून, आपल्या सर्वांसाठी एक प्रेरणा आहे.

इंग्रजांच्या जवळपास 150 वर्षांच्या गुलामगिरीतून आपल्या देशाने स्वातंत्र्य मिळवलं आणि 15 ऑगस्ट 1947 रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्यावर युनियन जॅक खाली उतरून तिरंगा फडकवण्यात आला. त्यामुळे 15 ऑगस्ट हा दिवस प्रत्येक भारतीयांसाठी एक खास दिवस. यंदा आपण 79 वा स्वातंत्र्य दिन साजरा करणार आहोत. पण ब्रिटिशांनी भारताला स्वातंत्र्य देताना 15 ऑगस्ट हाच दिवस का निवडला? भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा अर्ध्या रात्रीच का करण्यात आली? त्यामागे नेमकं काय कारण आहे? यामागच्या कारणाची मात्र अनेकांना माहिती नाही. ब्रिटीशांच्या गुलामगिरीतून भारत स्वातंत्र झाला तेव्हा लॉर्ड माउंटबॅटन हे व्हाईसरॉय होते. लॉर्ड माउंटबॅटन यांचा नशिबावर विश्वास होता. 15 ऑगस्ट ही तारीख आपल्यासाठी लकी आहे असा त्यांचा विश्वास होता. कारण याच तारखेला म्हणजेच 15 ऑगस्ट 1945 रोजी जपानी सैन्याने ब्रिटिशांसमोर आत्मसमर्पण केलं होतं. त्यावेळी माऊंटबॅटन हे मित्र राष्ट्रांचे कमांडर होते. त्यामुळे दुसऱ्या महायुद्धातील विजयाच्या नायकांमध्ये माऊंटबॅटन यांची गणना होते. यामुळेच जेव्हा भारताला स्वातंत्र्य देण्याची चर्चा झाली तेव्हा माउंटबॅटन यांनी 15 ऑगस्ट ही तारीख निवडली.

**मध्यरात्री स्वातंत्र्य का घोषित करण्यात आलं?**

भारताला 15 ऑगस्टच्या मध्यरात्री स्वातंत्र्य मिळालं. मध्यरात्री स्वातंत्र्य देण्यामागे अनेक कारणे होती. पाकिस्तान आणि भारताची फाळणी हे त्याचे एक कारण होते. त्यावेळी ब्रिटिश सरकारला भीती वाटत होती की जर स्वातंत्र्याच्या दिवशीच भारत आणि पाकिस्तानची फाळणी झाली तर त्यातून दंगली होतील आणि कायदा व सुव्यवस्था नियंत्रित करणे कठीण होईल. या कारणास्तव भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा ही मध्यरात्री करण्यात आली. दुसरा युक्तिवाद असा आहे की पाकिस्तानला भारताच्या एक दिवस आधी म्हणजेच 14 ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाले. 14 ऑगस्ट रोजी व्हाईसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांना पाकिस्तामध्ये कराचीला जावं लागणार होतं आणि ते रात्री उशिरा भारतात परतणार होते. यामुळेच त्या मध्यरात्रीच भारताला स्वातंत्र्य मिळणार हे ठरले होते.परंतु वस्तुस्थिती दर्शविते की ब्रिटीश सरकारने 15 ऑगस्ट 1947 रोजी पाकिस्तान आणि भारत अशी दोन्ही राष्ट्रे एकाच वेळी स्वतंत्र होतील अशी घोषणा केली होती. यामुळेच मध्यरात्री नवी दिल्लीत भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा झाली.

## 15 ऑगस्ट आणि 26 जानेवारी मधील 'हा' फरक माहितीय? कदाचित अनेकांना माहीत नसेल, सोप्या शब्दात जाणून घ्या..




यंदा भारत 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा करत आहे. 26 जानेवारी 1950 साली याच दिवशी भारताची राज्यघटना लागू झाली. प्रजासत्ताक दिवस हा आपण सर्वांसाठी राष्ट्रीय उत्सव आहे. या दिवशी देशाच्या सांस्कृतिक विविधतेची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्वाची झलक पाहायला मिळते. 2025 मध्ये देश आपला 76 वा प्रजासत्ताक दिन साजरा करण्याच्या तयारीत आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिनाची थीम 'सुवर्ण भारतः वारसा आणि विकास' अशी आहे. दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शाळा, महाविद्यालये, कोचिंग सेंटर, शासकीय तसेच निमसरकारी कार्यालयात ध्वजारोहण करण्यात येणार आहे. यासोबतच देशभक्तीपर गीते, नृत्य, नाटक, देशाशी निगडित संगीताचे आयोजन करण्यात येणार आहे. या काळात अनेकांच्या मनात एका गोष्टीबद्दल संभ्रम असतो की, प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन यात काय फरक आहे? आज आम्ही तुम्हाला प्रजासत्ताक दिन आणि स्वातंत्र्य दिन यातील फरक सांगणार आहोत. जे कदाचित बऱ्याच लोकांना माहीत नाही.

**15 ऑगस्ट आणि 26 जानेवारीमध्ये काय फरक आहे?**

15 ऑगस्ट 1947 रोजी म्हणजेच स्वातंत्र्यदिनी भारताला ब्रिटिश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले. तर, 26 जानेवारी 1950 रोजी म्हणजेच प्रजासत्ताक दिनाला भारतामध्ये संविधान लागू करण्यात आले, म्हणून तो प्रजासत्ताक दिन म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी देशात ध्वजारोहण केले जाते, जे भारताचे पंतप्रधान करतात. तर प्रजासत्ताक दिनी राष्ट्रपतींच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. दिल्लीच्या लाल किल्ल्यावर स्वातंत्र्य दिनाचे आयोजन केले जाते, जिथे देशाचे पंतप्रधान लाल किल्ल्यावरून ध्वज फडकावल्यानंतर देशवासियांना संबोधित करतात. तर, प्रजासत्ताक दिनाचे आयोजन दिल्लीतील इंडिया गेट आणि राष्ट्रपती भवनाजवळ ड्युटी पथावर केले जाते. 26 जानेवारीच्या उत्सवाची सांगता 29 जानेवारीला 'बीटिंग रिट्रीट' समारंभाने होते. तर स्वातंत्र्य दिनाचा उत्सव 15 ऑगस्टलाच संपतो. स्वातंत्र्यदिनी परेडचे आयोजन केले जात नाही. तर प्रजासत्ताक दिनी दिल्लीच्या कर्तव्य पथावर एक परेड असते. यात सर्व राज्यांचे देखावे दाखवले जातात. ज्यामध्ये त्या देशांची कला आणि संस्कृती दाखवली जाते.

**प्रजासत्ताक दिनाचे इतिहास आणि महत्त्व**

प्रजासत्ताक दिन 26 जानेवारी 1950 रोजी भारतीय राज्यघटना स्वीकारल्याच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. भारताला 1947 मध्ये ब्रिटीश राजवटीपासून स्वातंत्र्य मिळाले, 26 जानेवारी 1950 या दिवशी भारताची राज्यघटना लागू झाली. संविधान सभेचे पहिले अधिवेशन 9 डिसेंबर 1946 रोजी आणि शेवटचे अधिवेशन 26 नोव्हेंबर 1949 रोजी झाले आणि एक वषानंतर संविधान स्वीकारण्यात आले. डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी संविधानाच्या मसुदा समितीचे नेतृत्व केले. देशात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी राष्ट्रपती राष्ट्रध्वज फडकवतात. याशिवाय, भारताचे राष्ट्रपती देशातील पात्र नागरिकांना पद्म पुरस्कारांचे वितरण करतात. तसेच शूर सैनिकांना परमवीर चक्र, अशोक चक्र आणि वीर चक्र देऊन सन्मानित केले जाते. प्रजासत्ताक दिन परेडचे थेट प्रक्षेपण आणि वेबकास्ट देखील दरवर्षी केले जाते. जेणेकरून लोकांना परेड सहज पाहता येईल.



# ठाण्यात रंगणार दहीहंडीचा जल्लोष... १६ ऑगस्टला दिमाखदार पारंपरिक उत्सव

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक :**

धर्मवीर आनंद दिघे यांनी सुरू केलेल्या टेंभीनाका येथील दहीहंडी उत्सवाने ठाण्यातील पारंपरिक जल्लोषाला नवे पर्व दिले आहे. याच परंपरेत यंदा शनिवार, १६ ऑगस्ट रोजी थरांचा थरार, 'गोविंदा रे गोपाळ'च्या जयघोषासह मान्यवरांची उपस्थिती, गीत-संगीताचा जल्लोष आणि भगव्याचा रंगारंग सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रंगणार आहे.

मुंबईतील दहीहंडीचा उत्साह ठाण्यात आणण्याचा संकल्प धर्मवीर दिघे यांनी केला होता. दिमाखदार सोहळा, मराठमोळा साज, आकर्षक बक्षिसे आणि जोशपूर्ण वातावरणामुळे टेंभीनाका हंडी ठाण्याची ह्यमानाची हंडीह्ण म्हणून ओळखली जाते.

महोत्सवात नामवंत गायक, मराठी आणि हिंदी चित्रपट तसेच मालिकांतील लोकप्रिय कलाकारांचा सहभाग असेल. सुप्रसिद्ध लावणी सम्राज्ञीच्या नृत्याविष्कारासह रंगतदार गाणी, जोशपूर्ण नृत्य आणि नेत्रदीपक रोषणाईमुळे हा जल्लोष अधिक खुलणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, हेमंत पवार (शिवसेना ठाणे शहर विधानसभा प्रमुख), टेंभीनाका मित्रमंडळ, माजी नगरसेवक सुधीर कोकाटे, विभाग प्रमुख कमलेश चव्हाण यांच्यासह सर्व पदाधिकारी मेहनत घेत असल्याचे शिवसेना ठाणे जिल्हाप्रमुख खासदार नरेश म्हस्के यांनी नमूद केले आहे.

### ६,६५२ गोविंदांना विमा संरक्षण

वसई : दि. १६ ऑगस्ट रोजी दहीहंडी (गोपाळकाला) उत्सव साजरा होत असून दहीहंडी उत्सवात भाग घेणाऱ्या गोविंदा पथकातील गोविंदांच्या सुरक्षेच्या दृष्टीने वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत दरवर्षीप्रमाणे यावर्षीही महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत गोविंदांना दहीहंडी उत्सवादरम्यान विमा संरक्षण देण्यात आला आहे. यावर्षी शहरातील एकूण ९९ गोविंदा



पथकांतील ६,६५२ गोविंदांचा मे. ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीमार्फत विमा काढण्यात आला.

### १ लाख ५१ हजार रुपयांचे पारितोषिक

मुंबईतील गोविंदा पथकासाठी व ठाण्यातील गोविंदा पथकासाठी प्रत्येकी १ लाख ५१ हजार रुपयांचे पारितोषिक, सन्मानचिन्ह देण्यात येणार आहे. महिला गोविंदा पथकासाठी १,००,०००/- रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे, तर सात थर लावणाऱ्या गोविंदा पथकांसाठी १० हजार, सहा थरांसाठी ७ हजार, पाच थरांसाठी ५ हजार, तर चार थरांसाठी ४ हजार रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे.

### ३८ अर्ज प्राप्त

लाखो रुपयांच्या बक्षिसाचे लोणी चाखायला मिळत असल्यामुळे मुंबईनंतर गेल्या काही वर्षांत ठाण्यात गोविंदा पथकांची पावले वळतात. ठाणे हे गोविंदांची पंढरी म्हणून ओळखले जाते. त्यात यंदा निवडणुकीचा काळ असल्याने या वर्षीच्या दहीहांडी उत्सवांना अधिकचे महत्व प्राप्त झाले आहे. ठाणे महापालिका हद्दीत विविध प्रभाग समितींमधून महापालिकेला आतापर्यंत ३८ अर्ज प्राप्त झाले आहे.

### साइड मंडपासाठी २१ मंडळांना परवानगी

ठाणे : दहीहंडी उत्सवाची तयारी जोरात सुरू असून गोविंदा पथकांची देखील सरावासाठी लगबग वाढली आहे. तिकडे राजकीय मंडळींकडून हा उत्सव साजरा करण्यासाठी स्पर्धा सुरू आहे. अशातच ठाण्यात दहीहंडी उभारताना त्याच्या बाजूला मंडप उभारणीसाठी महापालिकेकडे अर्ज दाखल होऊ लागले आहेत. त्यानुसार आतापर्यंत ३८ मंडळांचे अर्ज महापालिकेला प्राप्त झाले असून त्यातील २१ मंडळांना महापालिकेने मंडप उभारण्यासाठी परवानगी दिली आहे. यात सर्वाधिक १० अर्ज वर्तकनगर प्रभाग समितीत आले आहेत.

### महानगरपालिकेचे आवाहन

सदर विमा हा अर्ज सादर केल्याच्या दिनांकापासून ते दि. १७ ऑगस्ट सकाळी ०६.०० पर्यंत लागू राहील. तथापि गोविंदांना विमा संरक्षण मिळाले असले तरी उत्सवाच्या ठिकाणी दहीहंडी उत्सव आयोजकांनी गोविंदांच्या सुरक्षेच्या सर्व उपाययोजना कराव्यात, कोणालाही दुखापत होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

# कबुतरांना खायला घालणे व्यावसायिकाला भोवले, गुन्हा दाखल

**■मुंबई। प्रतिनिधी:**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईत कबुतरांना खायला घालण्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. जैन समाजाने मुंबई उच्च न्यायालयाच्या विरोधात जात मुंबईतील अनेक भागामध्ये कबुतरांना खायला घालणे सुरूच ठेवले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर प्रसिद्ध दादर कबुतर खान्यासोबतच मुंबईतील अन्य काही कबुतर खाने बंद करण्यात आले आहेत. पण ६ ऑगस्टला आक्रमक झालेल्या जैन समाजाने दादर कबुतर खान्यावरील ताडपत्री हटवली. मात्र, पुन्हा एकदा न्यायालयाने हा निर्णय कायम ठेवला असून कबुतरांना खाद्य घालणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार, मुंबई महानगरपालिका आणि पोलिसांकडून या कारवाईला सुरुवात झाली आहे. अशातच आता कबुतरांना खाद्य खायला घालणे हे एका व्यावसायिकाला भोवले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका व्यावसायिकाने फोर्ट येथील कबुतर खान्यामध्ये



कबुतरांना खाद्य खायला घातले. चेतन ठक्कर असे या व्यावसायिकाचे नाव आहे. पण या व्यावसायिकाने कबुतरांना खाद्य दिल्यानंतर त्याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम २२३ आणि २७१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एम आर ए मार्ग पोलिसांकडून ही कारवाई करण्यात आली आहे. कबुतर खान्यांमध्ये कंट्रोल फिडींग करण्यापूर्वी पालिकेची परवानगी घेणे बंधनकारक आहे. परंतु, या व्यावसायिकाकडन अशी कोणतीही परवानगी घेण्यात आली नव्हती. ज्यामुळे चेतन ठक्कर या व्यावसायिकाला कबुतरांना खायला घातल्याप्रकरणी अटक करण्यात आली. पण काही वेळानंतर नोटीस देऊन सोडण्यात आल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे, बुधवारीच (ता. १३ ऑगस्ट) कबुतरखान्यांच्या बंदीसंदभार्तील महत्त्वाची सुनावणी मुंबई उच्च न्यायालयात पार पडली. यावेळी न्यायालयाने कबुतर खान्यांवरील बंदी आणि कबुतरांना कुठेही खायला घालणे यावरील बंदी कायम ठेवली आहे. पण या प्रकरणी आता तज्ज्ञांची समिती नेमण्यात आली आहे. ही समिती या प्रकरणाचा संपूर्ण अभ्यास करून त्यानंतर त्यासंदभार्तील माहिती न्यायालयासमोर सादर करेल. तर, याबाबतचा संपूर्ण निर्णय आता महापालिका आयुक्त घेतील. पण ज्या लोकांना कबुतरांना खायला घालायचे आहे, अशा लोकांनी अर्ज केल्यानंतर त्यांच्याशी आयुक्त बोलतील आणि मग याबाबतचा निर्णय घेण्यात येईल. पण तुर्तास तरी कबुतरांना खाद्य घालण्यास घातलेली बंदी न्यायालयाकडून कायम ठेवण्यात आली आहे. २० ऑगस्टपर्यंत समितीची अधिसूचना जारी करून समितीने चार आठवड्यांत अहवाल सादर करावा, असे मुंबई उच्च न्यायालयाकडून देण्यात आले आहेत.

# भटक्या कुत्र्यांची नसबंदी जलदगतीने करा आणि त्यांना निवारागृहात हलवा

**■मुंबई। प्रतिनिधी:**

सर्वोच्च न्यायालयाने भटक्या, उपद्रवी कुत्र्यांचे लहान मुलांसह महिला, वृद्ध आदिवरील वाढते हल्ले रोखण्यासाठी दिल्लीतील भटक्या कुत्र्यांची आश्रयस्थानात रवानगी करण्याचे आदेश दिले आहेत. मुंबईतही भटक्या कुत्र्यांचे वाढते हल्ले, नागरिकांना चावा घेण्याच्या घटना लक्षात घेता या कुत्र्यांची पालिकेने जलदगतीने नसबंदी करावी. तसेच, भटक्या, उपद्रवी कुत्र्यांसाठी आश्रयस्थाने तयार करून त्यांना तेथे स्थलांतरीत करावे, अशी मागणी भाजपाचे आमदार अमित साटम यांनी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे पत्राद्वारे केली आहे. मुंबईत दरवर्षी सरासरी ७०,००० कुत्रे चावण्याच्या घटना घडतात. राज्यातील कुत्रे



चावण्याच्या सुमारे २६ टक्के घटना एकट्या मुंबईत घडत आहेत. २०२४ च्या अखेरीस मुंबई पालिकेला त्यांच्या पोर्टलवर दर आठवड्याला कुत्रे चावण्याच्या सरासरी १५० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. जानेवारी ते ऑगस्ट २०२५ पर्यंत या पोर्टलवर १०,००० तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, अशी बाब आमदार अमित साटम यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणली आहे.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार (डब्ल्यूएचओ) २०२२ मध्ये भारतात रेबीजमुळे होणाऱ्या मृत्यूंची प्रत्यक्ष संख्या १८,००० आहे. भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्याची मुंबईतील परिस्थिती चिंताजनक आहे. शहरात 'रेबीज' प्रतिबंधक विरोधी लसींचा तुटवडा आहे. भटक्या कुत्र्यांकडून बालके, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वार यांच्यावर पाठलाग करत हल्ल्यांच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली असल्याचे आमदार अमित साटम यांनी पत्रामध्ये म्हटले आहे. भटक्या कुत्र्यांची समस्या नियंत्रणाबाहेर जाण्यापूर्वीच पालिकेने उपाय करण्याची नितांत गरज आहे. मुंबई महापालिकेने कुत्र्यांचा नसबंदी कार्यक्रम जलदगतीने पूर्ण करावा. कुत्र्यांसाठी आश्रयस्थाने तयार करावीत आणि त्यांचे स्थलांतर या आश्रयस्थानामध्ये करावे. या निर्णयामुळे कुत्र्यांकडून हल्ले होण्याच्या घटना कमी होतील आणि सार्वजनिक सुरक्षेची वाढती चिंता कमी होण्यास मदत होईल, असा दावा आमदार अमित साटम यांनी केला आहे. दिल्लीत कुत्रे चावण्याच्या आणि रेबीजच्या वाढत्या घटना लक्षात घेवून सर्व भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानात हलवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने ११ ऑगस्ट रोजी तेथील प्रशासनाला दिले होते, अशी बाब अमित साटम यांनी सदर पत्रातून आयुक्तांच्या निदर्शनास आणली आहे.

# कारवाई तर झालीच पाहिजे, कबुतर खान्यांबाबत राज ठाकरेंची स्पष्ट भूमिका


**■मुंबई। प्रतिनिधी:**

गेल्या काही दिवसांपासून मुंबईत कबुतरांना खायला घालण्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. जैन समाजाने मुंबई उच्च न्यायालयाच्या विरोधात जात मुंबईतील अनेक भागामध्ये कबुतरांना खायला घालणे सुरूच ठेवले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर प्रसिद्ध दादर कबुतर खान्यासोबतच मुंबईतील अन्य काही कबुतर खाने बंद करण्यात आले आहेत. पण मुंबईत ते सुद्धा दादर येथे कबुतर खान्यासंदर्भात वाद पेटलेला असताना महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी या प्रकरणावर कोणतीच भूमिका घेतली नव्हती. मात्र, आता ठाकरेंनी यावर आपली भूमिका स्पष्ट केली असून उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात जाणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे, असे राज ठाकरेंकडून स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. कबुतर खाना बंदी प्रकरणावर शांत असणारे मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी अखेर या प्रकरणी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. राज ठाकरेंनी गुरुवारी (ता. 14 ऑगस्ट) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना कबुतर खाना बंदीवरून सुरू असलेल्या वादाबाबत विचारणा करण्यात आली. तेव्हा त्यांनी आपले मत व्यक्त करत म्हटले की, कबुतर खाना बंदी प्रकरणात दोन वेगळ्या गोष्टी आहेत. पहिली गोष्ट म्हणजे या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय आहे आणि त्यामुळे मला असे वाटते की न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे सर्वांना वागावे लागेल. त्यामुळे जैन मुनींनी सुद्धा याबाबत विचार करणे गरजेचे आहे. जर न्यायालयाने बंदी घातली आहे, तर ती गोष्ट केली गेली पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे, कबुतरांमुळे काय काय प्रकारचे रोग होऊ शकतात, हे डॉक्टरांनी सांगितले आहे. त्यामुळे त्यांना खायला घालू नये, असे न्यायालयाने सांगितलेले असताना त्यांना खायला घालण्यात येत असेल तर, त्यांच्यावर पोलिसांनी कारवाई करणे गरजेचे आहे, असे ठाकरेंकडून स्पष्टपणे सांगण्यात आले आहे. तसेच, मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरांना खायला घालण्यावर बंदी घातलेली असताना सुद्धा जर धर्माच्या नावाखाली त्यांना खायला घालण्यात येत असेल तर ते अत्यंत चुकीचे आहे. कारण या गोष्टींसाठी एकाने सुरुवात केली की, बाकीचे सुद्धा तसंच वागायला सुरुवात करणार. त्यानंतर मग उच्च न्यायालयाने किंवा सर्वोच्च न्यायालयाने निर्णय द्यायचे कशाला? त्यामुळे काही गोष्टींचा विचार करणे गरजेचे आहे, असे यावेळी राज ठाकरेंनी म्हटले.

# वसई-विरारचे माजी आयुक्त अनिल पवार यांना ईडीकडून अटक

**■मुंबई। प्रतिनिधी:**

सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) बुधवारी वसई-विरार महानगरपालिकेचे माजी आयुक्त अनिल पवार यांना अटक केली. त्यांच्यासोबत बडतर्फ नगररचना उपसंचालक वाय. एस. रेड्डी, माजी नगरसेवक आणि बांधकाम व्यावसायिक सीताराम गुप्ता तसेच त्यांचा भाचा अरुण गुप्ता यांनाही ईडीने ताब्यात घेतले आहे. नालासोपारातील सरकारच्या ६० एकर जागेवर उभारलेल्या ४१ अनधिकृत इमारतींच्या प्रकरणात



मनीलाँड्रिंग संदर्भात ही कारवाई करण्यात आलेली आहे.

सर्व आरोपींना गुरुवारी मुंबईतील 'पीएमएलए' कोर्टात हजर केले जाणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या चारही आरोपींना वरळीतील ईडी कार्यालयाने चौकशीसाठी समन्स बजावले होते, त्यानंतर आता त्यांना अटक करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून ईडीने यासंदर्भात अनेक वेळा छापेमारी केली तसेच आरोपींचे जबाब नोंदवत संबंधित सर्व पुरावे गोळा केले. ''सर्व आरोपींची बुधवारी चौकशी केल्यानंतर त्यांचा या आरोपातील सहभाग निश्चित झाला आहे. त्यानंतर 'पीएमएलए' कायद्यांतर्गत त्यांना बुधवारी संध्याकाळी अटक करण्यात आली,'' असे ईडीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

# भाईंदरमध्ये पोलीस शिपाईची आत्महत्या

**■मिरारोड। प्रतिनिधी:**

भाईंदर पोलीस ठाण्यात कार्यरत पोलीस शिपायाने गुरुवारी सकाळी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. या घटनेने पोलीस आयुक्तालयात एकच खळबळ उडाली आहे. रितिक चौहान(वय. २४) असे या पोलीस शिपायाचे नाव आहे. मिरा- भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालयात २०२३ च्या पोलीस भरतीद्वारे रितिक चौहान सामील झाला. त्यानंतर भाईंदर पोलीस ठाण्यात सध्या नेमणूक होती.रितिक मूळचा नाशिक जिल्ह्यातील सिन्नर गावातील रहिवासी होता. पोलीस भरती झाल्यानंतर तो भाईंदर पश्चिमेच्या बेकरी गल्लीमध्ये आपल्या आईसोबत भाडेतत्त्वावर



राहत होता. दोन दिवसांपूर्वी आई काही कामानिमित्त गावी गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.गळफास घेतल्यानंतर पोलिसांना माहिती मिळाली. घटनास्थळी जाऊन मृतदेह ताब्यात घेऊन पंडित भीमसेन जोशी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठण्यात आला आहे. आत्महत्येच कारण स्पष्ट झाले नसून तपास सुरु असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कांबळे यांनी दिली.

# यंदाही आयडियलच्या हंडीमध्ये विशेष आकर्षण, संभाजी महाराजांच्या शौर्याचा इतिहास मांडला जाणार

**■मुंबई। प्रतिनिधी:**

दरवर्षी प्रमाणे यंदाही दादरमधील आयडियल गल्लीतील दहीहंडी उत्सव पाहण्यासाठी शनिवारी १६ ऑगस्टला मोठ्या संख्येने नागरिकांची गर्दी उसळणार आहे. यापूर्वी शिवसागर गोविंदा पथकाकडून मानवी मनोरा रचनेत विविध संकल्पनांवर आधारित देखाव्याचे सादरीकरण केले गेले आहे. यंदाही पथकाकडून तीन थर रचून चौथ्या थरावर छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा इतिहास मांडला जाणार आहे. या देखाव्याचे सादरीकरण सकाळी १०.३० वाजता सुरू होईल. या सादरीकरणातून महाराजांच्या शौयार्चा इतिहास सामाजिक स्तरावर मांडण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि आयडियल बूक कंपनी (दादर) यांच्या संयुक्त विद्यमानाने तसेच श्री साई दत्त मित्र मंडळ आणि बाबू शेठ पवार व मित्र मंडळ यांच्या सहकार्याने ''आयडियल सेलेब्रिटी व पर्यावरणपूरक दहीहंडी उत्सव २०२५'' मोठ्या उत्साहात साजरी करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात महिला दहीहंडी, सेलेब्रिटी दहीहंडी आणि देखावा सादरीकरण दहीहंडीची सुरुवात आयडियच्या गल्लीत झाली. यंदाचे पुरुष दहीहंडीचे ५१ वे वर्ष, महिला-दहीहंडीचे ३२ वे वर्ष, सेलेब्रिटी




दहीहंडीचे २३ वे वर्ष आणि देखावा सादरीकरण दहीहंडीचे ४ थे वर्ष असणार आहे. यंदाच्या वर्षी महिला आणि पुरुष गोविंदा पथकांच्या विशेष सलामीसह पर्यावरणपूरक दहीहंडी उत्सवाची सुरुवात होईल. या दहीहंडी उत्सवात प्रमुख पाहुणे म्हणून रोहन कदम (मिस्टर एशिया), सुहास खामकर (मिस्टर इंडिया) आणि कलाकार भूषण घाडी ही मंडळी उपस्थित राहणार आहेत.

दरवर्षीप्रमाणे यंदाच्याव वर्षी सुद्धा आयडियलच्या हंडीमध्ये दिव्यांग व अंध बंधू भगिनींचे गोविंदा पथकाचे मनोरे हे या दहीहंडी उत्सवाचे मुख्य आकर्षण असणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रभर दादरमधील या दहीहंडीची ओळख पर्यावरणपूरक दहीहंडी म्हणून आहे. पण सोबतच सेलिब्रिटी दहीहंडी म्हणून देखील प्रसिद्ध आहे. दरवर्षी या दहीहंडीला मोठ्या संख्येने हिंदी व मराठी सिनेसृष्टीमधील कलाकार उपस्थित असतात. त्याप्रमाणे यंदाही अनेक सेलिब्रिटीजची या हंडीला उपस्थिती असणार आहे.

दशावतार हा कोकणातील एक अत्यंत लोकप्रिय आणि पारंपरिक लोकनाट्यप्रकार आहे. तो विशेषतः सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि कोकण किनारपट्टीवर शेकडो वर्षांपासून प्रचलित आहे. यावर्षी देखील २ स्टुडिओज प्रस्तुत 'दशावतार' चित्रपटातील कलाकार अभिनय बेर्डे, सिद्धार्थ मेनन आणि प्रियदर्शिनी इंदलकर ह्या दहीहंडीला उपस्थित राहणार आहेत. तसेच मराठी सिनेसृष्टीमधील कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित राहतील, सोबत दरवर्षी प्रमाणे पर्यावरणपूरक सण कसे साजरे करावेत, या विषयावर पथनाट्य सादरीकरण करण्यात येणार आहे.

# अनधिकृत बांधकामधारकांचा दंड माफ... महापालिकेला सुमारे १५० कोटींचा फटका... १ लाख ४५ हजार मालमत्ताधारकांना फायदा

**■ठाणे। प्रतिनिधी:**

खर्च आणि उत्पन्न याचा ताळमेळ साधता येत नसल्याने ठाणे महापालिकेचे आर्थिक चक्र बिघडत चालले असताना अनधिकृत बांधकामांना लावण्यात आलेली ही शास्ती (दंड) माफी करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे पालिकेस तब्बल १५० कोटींचा फटका बसणार आहे. २००९ पासून ते २०१७ पर्यंतच्या अनधिकृत बांधकामांवरील दंड माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ठाणे महापालिका हद्दीत अनधिकृत बांधकामे वाढू नयेत, यासाठी अशा मालमत्तांना मालमत्ताकराच्या अधिक दीडपट शास्ती लावण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु त्यानंतरही शहरात अनधिकृत बांधकामे वाढत असल्याचे दिसून आले. याउलट आता या अनधिकृत बांधकामांना लावण्यात आलेली ही शास्ती (दंड) माफी करण्याचा निर्णय नुकताच घेण्यात आला आहे. त्याचा फायदा शहरातील १ लाख ४५ हजार मालमत्ताधारकांना होणार असला तरी महापालिकेच्या तिजोरीला सुमारे १५० कोटींची तूट सहन करावी लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. अनधिकृत बांधकामावरील दंड माफ केल्यास मालमत्ताधारकांकडून मूळ कराचा भरणा होईल, या उद्देशाने पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या धर्तीवर ठाणे महापालिका हद्दीतील दंड



माफ करण्याचा निर्णय पावसाळी अधिवेशनादरम्यान झालेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. त्यानंतर सोमवारी संध्याकाळी उशिरा यासंदर्भात अद्यादेश काढण्यात आला असून ठाण्यातील २००९ पासून ते २०१७ पर्यंतच्या अनधिकृत बांधकामांवरील दंड माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा दंड साधारणपणे १५० कोटींच्या घरात आहे. यामुळे मालमत्ता कराची मूळ रक्कम मिळणार असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे. परंतु यापूर्वी ज्या अनाधिकृत बांधकाम धारकांनी हा दंड महापालिकेला भरलेला आहे, तो परत मिळणार का? याचे उत्तर प्रशासन किंवा राज्य शासनाने देखील दिलेले नाही. ठाणे महापालिका क्षेत्रातील अवैध बांधकामावर करण्यात येणारा दंड हा २००९ पासून थकीत होता. तसेच, आकारल्या जाणाऱ्या दंडाचे प्रमाण मूळ करापेक्षा जास्त होते. त्यामुळे मालमत्ताधारकांकडून दंड भरला जात नव्हता. त्याचा परिणाम ठाणे महापालिकेला कर रूपाने मिळणाऱ्या महसुलावर झाला असल्याचा दावा महापालिकेने केला होता. परंतु जेव्हा हा दंड लावण्यात आला होता, त्यानंतर महापालिकेच्या उत्पन्नात वाढ झाल्याचाही दावा महापालिकेच्या संबधित विभागाने केला होता. शहरातील अनेक बांधकामे २००९-२०१७ नंतरही अनधिकृत पद्धतीने झाल्याचे वास्तव आहे. या निर्णयामुळे अनधिकृत बांधकामधारकांना दिलासा मिळाल्याने भविष्यात अशा प्रकारचे बांधकाम आणखी वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com**

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com